# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 11/10/2019 (शुक्रवार)
# (दुपार)

---

## पाण्यात बुडुन मृत्यु

1) पो. स्टे. मौदा :– अंतर्गत कन्हान नदी, मौदा येथे दिनांक 09/10/2019 चे 16.00 वा. दरम्यान किरन सुरेश भोयर, वय 23 वर्ष, रा. खराडा पुर्नवसन हा दुर्गादेवी विसर्जन करन्याकरिता कन्हान नदी मौदा येथे गेला होता. दरम्यान किरन भोयर हा दुर्गादेवी विर्सजन करतांना नदीमध्ये उतरला तेव्हा त्याचा तोल गेल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक प्रकाश थोटे यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव कुथे हे करीत आहे.

2) पो. स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर सती अनुसया माता मंदीर पारडसिंगा बाजुला असलेले सुजाता पाटील तलाव येथे दिनांक 10/10/2019 चे 12.00 वा. दरम्यान कृष्णा उर्फ किसना व्यंकटी काकडे वय 28 वर्ष, रा. पारडसिंगा, काटोल हा फिर्यादी नामे– निलेश चिंधुजी सुरसूजे, वय 26 वर्ष, रा. पारडशिंगा याच्या सोबत घरगुती दुर्गा विसर्जनाकरीता पारडसिंगा सती अनुसया माता मंदीराचे बाजुला असलेले सुजाता पाटील तलाव येथे गेला होता. दरम्यान कृष्णा काकडे हा तलावाच्या पाण्यात उतरला व तलावाचे पाण्यात तोल गेल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार राजेन्द्र वरोकर हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावर गंगालडोह येथे दिनांक 03/10/2019 चे 10.30 वा. दरम्यान बबन देवीदास मंडारे(मृतक), वय 30 वर्ष, रा. गंगालदोह याने राहत्या घरी कुणीही हजर नसतांना विषारी औषध प्राशन केले. दरम्यान त्याला उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता दि. 08/10/19 चे 19:00 वा. त्याचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अरूण भेंडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत देवलापार टाऊन येथे दिनांक 08/09/2019 चे 23.00 वा. दरम्यान विजय वामन भोवते(मृतक), वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 5, देवलापार हा बाहेरून विषारी औषध प्राशन करून आला. दरम्यान प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय देवलापार व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता दि. 09/10/19 चे 03:00 वा. त्याचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजेन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा नागुलवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर